बीड । महाराष्ट्र
गुरूवार दि. ५ मार्च २०२६
वर्ष ५ वे । अंक ३३२
पान १ । पाने ४
किंमत ३ रुपये

महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955 | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://marathwadapatra.com | https://epaper.marathwadapatra.com










# बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करणारे 316 अधिकारी निलंबित

मुंबई । वृत्तसेवा

**बोगस दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून शासकीय नोकरीत असलेल्या ३१६ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सरकारने मोठा धक्का दिला आहे. ४० टक्क्यांहून कमी दिव्यांग असलेल्या आणि बोगस प्रमाणपत्र सादर केलेल्या ३१६ जणांचं निलंबन करण्यात आल्याची माहिती मंत्री अतुल सावे यांनी दिली. भाजपचे आमदार श्रीकांत भारतीय यांनी लेखी प्रश्नाच्या माध्यमातून हा प्रश्न उपस्थित केला होता. राज्यातील २८ जिल्हा परिषदेत पडताळणीअंती प्रमाणपत्र नसलेले, बनावट दिव्यांग प्रमाणपत्र आणि ४० टक्क्यांपेक्षा कमी दिव्यांगत्व असलेल्या ३१६ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.**

भाजपचे आमदार श्रीकांत भारतीय यांनी या संदर्भात लेखी प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर मंत्री अतुल सावे यांनी दिलेल्या लेखी उत्तरात २८ जिल्हा परिषदांचा अंतरिम अहवालात १० हजार ९२२ दिव्यांग अधिकाऱ्यांची नोंद असल्याचं स्पष्ट झालं. यातील ६ हजार २१८ कर्मचाऱ्यांची पडताळणी पूर्ण झाली आहे. यातील ३१६ अधिकाऱ्यांकडे प्रमाणपत्र नसणे, बनावट दिव्यांग प्रमाणपत्र, ४० टक्क्यांपेक्षा कमी दिव्यांग आढळलेले अधिकारी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. राज्य सरकारच्या पडताळणीत अजूनही जवळपास पाच हजार अधिकाऱ्यांची पडताळणी बाकी आहे. त्यामुळे बोगस प्रमाणपत्र सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांमध्ये आता राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाने बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांच्या प्रकरणांवर मोठी कारवाई सुरू केली आहे. सचिव तुकाराम मुंढे यांनी राज्यातील सर्व ३४ जिल्हा परिषदांना लेखी ▶▶ पान २ वर

## अनेक बोगस कर्मचारी अजूनही 'गॅस'वर



### बोगस दिव्यांगांवर कारवाईचा बडगा



तुकाराम मुंडे यांनी राज्यातील सर्व ३४ जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिव्यांग प्रमाणपत्रांची तपासणी करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. विशेष म्हणजे शिक्षण, आरोग्य, बांधकाम विभागासह सर्व विभागांतील ▶▶ पान २ वर

## शरद पवारांना उमेदवारी!

मुंबई । वृत्तसेवा

राज्यसभा निवडणुकीसाठी भाजपनं बुधवारी(ता.४ मार्च) चार उमेदवारांची घोषणा केली. त्यानंतर काही तासांतच महाविकास आघाडीच्या गोटातून मोठी अपडेट समोर ▶▶ पान २ वर

## वकिलाला झालेल्या मारहाण प्रकरणी संबंधितावर त्वरित कारवाई करा

मुंबई । प्रतिनिधी

बीड जिल्हा वकील संघाचे सदस्य ॲड.राम पांडुरंग डोंगरे यांना जिल्हा न्यायालयाच्या आवारातच काही दिवसांपूर्वी पार्किंगच्या वादातून काही लोकांनी मारहाण केली होती. याप्रकरणी संबंधितावर त्वरित कारवाई करावी अशी मागणी मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात आमदार सतीश चव्हाण यांनी आज (दि.४) राज्याचे मुख्यमंत्री

### आ.सतीश चव्हाण यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन निवेदन दिले. बीड जिल्हा वकील संघाचे सदस्य ड.राम पांडुरंग डोंगरे हे न्यायालय परिसरात वकीली व नोटरी म्हणून काम करतात. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी न्यायालय आवारात कामकाज करत असताना ▶▶ पान २ वर

## जिल्ह्यात इंधन टंचाईच्या अफवांवर विश्वास ठेवू नका

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात आखाती देशांमधील युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधन टंचाई निर्माण झाल्याच्या अफवा पसरत असल्याने पेट्रोल पंपांवर नागरिकांनी मोठी गर्दी केली आहे. मात्र, जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा सुरळीत सुरू असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी यांनी आज, ४ मार्च रोजी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली

### जिल्हा प्रशासनाचे नागरिकांना आवाहन

आहे. सध्या आखाती देशांतील तणावामुळे इंधन टंचाई होईल या भीतीने अनेक ठिकाणी नागरिक वाहनांमध्ये अतिरिक्त इंधन साठवण्यासाठी गर्दी करत आहेत. या पार्श्वभूमीवर ▶▶ पान २ वर

## मला राजकारणच नाही तर आयुष्यातून उठवण्याचे हे षडयंत्र-धनंजय मुंडे

मुंबई । वृत्तसेवा

राज्याच्या कृषीमंत्री पदी असताना केलेल्या कृषी साहित्य खरेदी संदर्भात मा. उच्च न्यायालयापाठोपाठ राज्य लोकायुक्त यांनी देखील आपल्याविरुद्ध केलेले सर्व आरोप फेटाळून लावले असून आपण शासनाच्या नियमानुसार व शेतकऱ्यांचे हित समोर ठेऊनच संबंधित खरेदी बाबतचा निर्णय शासनाच्या विशेष कृती आराखड्याच्या अंतर्गत घेतला होता. या प्रकरणात न्यायव्यवस्था आणि नियतीने सत्य समोर आणले आहे, असे म्हणत धनंजय मुंडे यांनी लोकायुक्तांच्या निर्णयावर समाधान व्यक्त केले आहे.



आज मुंबईतील विधानभवन येथे धनंजय मुंडे यांनी बऱ्याच दिवसानंतर पत्रकारांशी सविस्तर चर्चा केली. कृषी साहित्य खरेदी, ऑफिस ऑफ प्रॉफिट असे नाना प्रकारचे आरोप माझ्यावर करण्यात आले, यामध्ये कृषी खरेदीबाबत सुरुवातीला मात. उच्च न्यायालयात ज्यांनी तक्रार केली होती, त्यांना खोटे पुरावे दिले आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून शासनाची बदनामी केली म्हणून उच्च न्यायालयाने एक लाखांचा दंड ठोठावला, त्यांनी तो भरला सुद्धा.ऑफिस ऑफ प्रॉफिट, पिक विमा असा कोणताही आरोप सिद्ध झाला नाही, मात्र माझ्या बदनामीच्या ट्रायल रंगवून दाखवल्या केल्या. हे एक मोठे षडयंत्र असून, मला केवळ राजकारण किंवा समाजकारण यामधून संपवायचे नाही तर काही लोकांना मी या पृथ्वीतलावर ▶▶ पान २ वर

## बळीराजा पाणंद रस्ता योजनेसाठी शासन स्तरावरून निधीची तरतुद करावी

मुंबई । वृत्तसेवा

मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना ही महायुती शासनाने सुरु केलेली महत्वाकांक्षी योजना शेतकऱ्यांसाठी फलदायी ठरणारी आहे. खऱ्या अर्थाने शेतमाल वाहतुकीसाठी या योजनेचा मोठा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे. ग्रामीण भागात पायाभुत सुविधा वाढवून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी ही योजना फायदेशीर ठरत आहे. मात्र या योजनेसाठी शासन स्तरावर स्वतंत्र लेखाशिर्ष नसल्याने निधीच्या तरतुदीची अडचण येत आहे. अपुऱ्या निधीमुळे योजनेची अंमल बजावणी सक्षमपणे होणार नाही, त्यामुळे शासनाने मुख्यमंत्री बळीराज पाणंद रस्ता योजनेसाठी स्वतंत्र



### आ.पंडित यांची विधानसभेत मागणी

लेखाशिर्ष निर्माण करून निधीची विशेष तरतुद करावी अशी आग्रही मागणी आ. विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत केली. गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी बुधवार, दि.४ मार्च रोजी सभागृहात विविध विषयांवरील चर्चेत सहभाग नोंदविला. आखाती देशात अडकलेल्या बीड जिल्ह्यातील पर्यटक आणि प्रवाशांना सुखरूप मायदेशी परत आणण्यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करावेत अशी मागणी त्यांनी केली. नियम २९३ अन्वये चर्चेत सहभाग घेताना आ. विजयसिंह पंडित यांनी मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ता योजनेसाठी शासन स्तरावर स्वतंत्र लेखाशिर्षाची निर्मिती करून निधीची विशेष ▶▶ पान २ वर

### अंबाजोगाई जिल्हा कारागृहाच्या जागेला...

## संरक्षक भिंत उभारण्यासाठी ४ कोटींचा निधी



अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील प्रस्तावित जिल्हा कारा गृहाच्या ३० एकर शासकीय जमिनीला सुरक्षा कारणास्तव संरक्षक भिंत उभारण्यासाठी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी ४ कोटी ५ लक्ष ७९ हजार २५८ रुपयांच्या निधीला अधिकृत प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. अंबाजोगाई येथे जिल्हा कारागृह व्हावे आणि या नियोजित जागेवर भविष्यात कोणतीही अतिक्रमणे होऊ नयेत यासाठी

### आ.मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश

आमदार नमिता मुंदडा यांनी शासनाकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला या निर्णयामुळे मोठे यश मिळाले आहे. ही प्रशासकीय मान्यता जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२०२६ अंतर्गत देण्यात आली आहे. या महत्त्वपूर्ण प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत या कामाला मंजुरी देण्यात आली असून यामध्ये कारागृहाच्या सर्वे क्रमांक १/अ/५ मधील ३० एकर परिसराची नाकेबंदी करण्यासाठी मोठी संरक्षक भिंत उभारली जाणार आहे. अधिक्षक जिल्हा कारागृह यांच्यामार्फत या कामाची अंमलबजावणी केली जाणार असून या कामासाठी ९ जानेवारी २०२६ रोजी तांत्रिक मान्यता देण्यात आली होती. बीडच्या एकमेव जिल्हा कारागृहावरील ताण लक्षात घेता ▶▶ पान २ वर

## अखेर प्रदीप फाटे पोलिसांच्या ताब्यात

बीड । प्रतिनिधी

जीएसटी विभागातील अधिकारी सचिन जाधवर यांनी दीड महिन्यांपूर्वी मांजरसुंबा महामार्गावर कपिलधारवाडी परिसरात जीवन संपवले होते.याप्रकरणी जीएसटी अधिकारी प्रदीप फाटे यांच्या विरोधात बीड ग्रामीण पोलिस ठाण्यात जीवन संपवण्यास कारणीभूत प्रकरणी गुन्हा

### स्थानिक गुन्हे शाखेचे मोठी कारवाई

नोंद करण्यात आला होता.अखेर स्थानिक गुन्हे शाखेने पुण्याच्या वाघोलीमधून आरोपीला ताब्यात घेतले आहे. ▶▶ पान २ वर

## संपादकीय

# अर्थव्यवस्थेला हादरे!

मध्य पूर्वेतील तणावाने धोक्याची पातळी ओलांडली असून जग तिस–या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे. अमेरिका आणि इस्त्रायलने संयुक्तपणे इराणच्या विविध तळांवर केलेल्या भीषण हल्ल्यांमुळे या प्रदेशातील परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली आहे. या लष्करी कारवाईत इराणमधील सुमारे ३० संवेदनशील ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले असून यात आतापर्यंत २०० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला आहे आणि ८०० हून अधिक गंभीर जखमी झाले आहेत. इस्त्रायल–इराणमधील हा संघर्ष अचानक उद्भवलेला नाही. २०२५ च्या सुरुवातीपासूनच इराणच्या वाढत्या अण्वस्त्र कार्यक्रमामुळे आणि क्षेपणास्त्र क्षमतेच्या विस्तारामुळे इस्त्रायलने आक्रमक पवित्रा घेतला होता. जानेवारी महिन्यात इस्त्रायलने इराणला वारंवार ताकीद दिली होती की, त्यांचा अण्वस्त्र कार्यक्रम प्रादेशिक शांततेसाठी धोकादायक आहे. इराणने इस्त्रायलच्या इशा–यांकडे दुर्लक्ष करून आपली अण्वस्त्र प्रक्रिया आणि लांब पल्ल्यांच्या क्षेपणास्त्रांची चाचणी सुरूच ठेवली. वारंवार समज देऊनही इराण माघार घेत नसल्याचे पाहून इस्त्रायलने इराणची राजधानी तेहरानसह प्रमुख सैन्यतळांवर हवाई हल्ले चढवले. हा संघर्ष केवळ दोन देशांपुरता मर्यादित न राहता त्याचे पडसाद जागतिक बाजारपेठेवर उमटू लागले आहेत. इराण हा जगातील सर्वांत मोठ्या तेल उत्पादक देशांपैकी एक असल्याने पुरवठा साखळी विस्कळीत होण्याची भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाल्यास भारतात पेट्रोल आणि डिझेलचे दर गगनाला भिडू शकतात. त्यामुळे महागाई वाढण्याची शक्यता आहे. जागतिक अनिश्चिततेमुळे गुंतवणूकदार आपला पैसा शेअर बाजारातून काढून सुरक्षित मानल्या जाणा–या सोने–चांदीमध्ये गुंतवत आहेत. त्यामुळे सोने–चांदीचे दर ऐतिहासिक उच्चांकी पातळी गाठू शकतात. पंतप्रधान मोदींनी गत आठवड्यात केलेला इस्त्रायल दौरा अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या दौ–यात दोन्ही देशांदरम्यान अनेक संरक्षण आणि आर्थिक करार झाले आहेत. त्यामुळे भारताचे इस्त्रायलशी असलेले संबंध अधिक दृढ झाले आहेत. मात्र, भारतासाठी इराणचे महत्त्वही तितकेच आहे. इराणमधील चाबहार बंदरात भारताने मोठी गुंतवणूक केली असून, हे बंदर भारतासाठी मध्य आशियाचा मुख्य मार्ग आहे. एकीकडे मित्रराष्ट्र इस्त्रायल आणि दुसरीकडे सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा इराण, अशा दोन देशांच्या युद्धात कोणाचीही उघड बाजू घेणे भारतासाठी मोठे राजनैतिक आव्हान ठरणार आहे. पश्चिम आशियातील इस्त्रायल–इराणमधील वाढत्या लष्करी संघर्षामुळे केवळ जागतिक राजकारणच नाही तर भारताची अर्थव्यवस्थाही प्रभावित झाली आहे. अमेरिका आणि इस्त्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर आणि त्याला प्रत्युत्तर म्हणून सुरू झालेल्या क्षेपणास्त्र युद्धामुळे आखाती देशातील सुरक्षा धोक्यात आली आहे. याचा थेट परिणाम भारताच्या इंधनपुरवठ्यावर, व्यापारावर आणि विमान वाहतुकीवर होत आहे. आखाती देश हे जागतिक ऊर्जा पुरवठ्याचे मुख्य केंद्र आहेत. या प्रदेशातील अस्थिरतेमुळे कच्च्या तेलाच्या जागतिक किमतीत मोठी वाढ झाली आहे. भारताची इंधनाची गरज मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून असल्याने, कच्च्या तेलाचे दर भडकल्यामुळे देशांतर्गत पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढण्याची दाट शक्यता आहे. त्याचबरोबर विमान इंधनाच्या दरातही वाढ होत असून त्याचा बोजा विमान कंपन्यांवर पडत आहे. आखाती देश हा भारताचा युरोप, मध्यपूर्व आणि उत्तर अमेरिकेशी जोडणारा मुख्य व्यापारी मार्ग आहे. अनेक देशांनी आपली हवाई हद्द बंद केल्यामुळे किंवा त्यावर निर्बंध आणल्यामुळे मालवाहतुकीवर परिणाम झाला आहे. हवाई क्षेत्र बंद असल्याने भारतीय विमानांना वळसा घालून जावे लागत आहे. त्यामुळे प्रवासाचा वेळ ४५ मिनिटे ते २ तासांपर्यंत वाढला असून इंधनाचा खर्च प्रचंड वाढला आहे. मार्ग बदलल्यामुळे आणि तेलाच्या किमती वाढल्यामुळे खर्च वाढला आहे. त्याचा परिणाम आयात–निर्यात होणा–या वस्तूंच्या किमतीवर होऊन महागाई वाढण्याची भीती आहे. दुबई, दोहा आणि अबुधाबी ही भारतीय प्रवाशांसाठी महत्त्वाची पर्यटन स्थळे आहेत. या विमानतळांवरील कामकाज विस्कळीत झाल्यामुळे हजारो भारतीय प्रवासी अडकून पडले आहेत. पर्यटनावरही याचे नकारात्मक परिणाम होत असून अनेकांनी आपले आखाती देशांचे दौरे रद्द केले आहेत. व्यावसायिक प्रवासही कमी झाला असून कंपन्यांनी आपल्या कर्मचा–यांना व्हीडीओ कॉलद्वारे बैठका घेण्याचे आवाहन केले आहे. भारताचे पर्यटन आणि हवाई क्षेत्र कोरोना महामारीनंतर आता कुठे रुळावर येत होते, मात्र या युद्धामुळे पुन्हा एकदा अनिश्चिततेचे सावट निर्माण झाले आहे. जर हा संघर्ष लांबला तर भारताच्या परकीय चलन साठ्यावर याचा परिणाम होऊ शकतो. अमेरिका आणि इराणमधील संघर्ष आता अधिक तीव्र झाला असून या युद्धाच्या कालावधीबाबत ट्रम्प यांनी महत्त्वाचे संकेत दिले आहेत. त्यांच्या मते इराणसारख्या मोठ्या देशाविरुद्धची ही लष्करी कारवाई किमान ४ आठवडे किंवा त्यापेक्षा अधिक काळ चालू शकते. अमेरिकेने या मोहिमेसाठी दीर्घकालीन तयारी केली आहे. त्यामुळे हे युद्ध झटपट संपण्याची शक्यता दिसत नाही. ट्रम्प यांनी दावा केला आहे की, इराणमधील ऑपरेशन नियोजित पद्धतीने सुरू आहे. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खोमेनीसह लष्करी आणि राजकीय वर्तुळातील सुमारे ४८ बड्या नेत्यांना या हल्ल्यात कंठस्नान घालण्यात आले आहे. हे जगातील आतापर्यंतचे सर्वांत गुंतागुंतीचे आणि प्रभावी लष्करी आक्रमण असल्याचे ट्रम्प यांनी म्हटले आहे. तणाव शिगेला पोहोचलेला असतानाही ट्रम्प यांनी इराणी नेत्यांशी चर्चेला तयार असल्याचे संकेत दिले आहेत. मात्र, ही चर्चा नेमकी कधी होईल ते त्यांनी स्पष्ट केले नाही. या युद्धामुळे जगाच्या अर्थकारणाला झळ बसणार आहे. जगाला होणारा तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा खंडित होऊ शकतो. गाझापट्टी आणि युक्रेनमधील युद्धानंतर आता पश्चिम आशियात युद्ध सुरू झाल्याने त्याचे आंतरराष्ट्रीय राजकारण व व्यापारावर अत्यंत दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे.

# आखाती युद्धाचा फटका; कांदा, द्राक्षे-बेदाणा व्यापारावर परिणाम

## सुरेश धस यांची सभागृहात आक्रमक मागणी

**मुंबई** । प्रतिनिधी

सुरेश धस यांनी महाराष्ट्र विधिमंडळ यांच्या अर्थसंकल् पीय अधिवेशन २०२६ दरम्यान आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील कृषी निर्यातीवर होत असलेल्या गंभीर परिणामांचा मुद्दा लक्षवेधी सूचनेद्वारे सभागृहात उपस्थित केला. कांदा, द्राक्षे आणि बेदाणा या प्रमुख पिकांच्या निर्यात व्यापारावर मोठा परिणाम होत असून शेतकरी व व्यापाऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी नमूद केले. धस यांनी सांगितले की, आखाती देश हे महाराष्ट्रातील कृषी उत्पादनांचे प्रमुख निर्यात बाजारपेठ असून सध्याच्या परिस्थितीमुळे मालाची निर्यात रखडली आहे. परिणामी बाजारभाव घसरत असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी त्यांनी केली. सध्या अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असल्याने तत्काळ बैठक घेणे शक्य नसले तरी अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर संबंधित मंत्र्यांनी तातडीने बैठक बोलावून ठोस निर्णय घ्यावा, अशी विनंतीही त्यांनी सभागृहात केली. यावर संबंधित मंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेत लवकरच बैठक घेण्याचे आश्वासन दिले. दरम्यान, चीनमार्गे अफगाणिस्तान येथून मोठ्या प्रमाणावर बोगस बेदाणा राज्यात दाखल होत असल्याचा गंभीर मुद्दाही धस यांनी उपस्थित केला. पिंपळगाव बसवंत येथील प्रमुख बाजार समिती तसेच तासगाव परिसरात अशा प्रकारचा माल आल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. या प्रकरणातील जबाबदारांवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली. या प्रश्नांमुळे राज्यातील कृषी व व्यापार क्षेत्रातील चिंता वाढली असून सरकारच्या पुढील निर्णयाकडे शेतकरी व व्यापाऱ्यांचे लक्ष लागले आहे.



# बीडच्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांना झळ



जिल्ह्यातील तेलघना येथील शेतकऱ्यांवर सध्या इराण आणि इस्त्रायल यांच्यात सुरू असलेल्या युद्धाचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत. आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या या संघर्षामुळे कांद्याची निर्यात मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाली असून, त्याचा थेट फटका स्थानिक बाजारपेठेतील दरांना बसला आहे. आपल्या शेतातील कांदा विक्रीसाठी हैदराबादला नेणाऱ्या शेतकऱ्यांना तिथे अत्यंत कमी भाव मिळाल्याने आपले अश्रू अनावर झाले. आधीच अवकाळी पावसाने पिकाचे नुकसान केलेले असताना, आता शिल्लक राहिलेल्या मालाला योग्य दर मिळत नसल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. आखाती देशांतील युद्धामुळे निर्यातीचे मार्ग बंद झाल्याने कांद्याला अपेक्षित दर मिळत नसल्याचे वास्तव समोर आले आहे. दरवर्षी साधारणपणे २५ ते ३० रुपये मिळणारा भाव यंदा पूर्णपणे कोसळला असून, शेतकऱ्यांचा लागवड खर्चही निघणे कठीण झाले आहे. तेलघना गावातील अनेक शेतकऱ्यांची हीच व्यथा असून, अनेकांनी बँक आणि सावकारांकडून घेतलेले कर्ज कसे फेडायचे या विवंचनेत ते आहेत. कांदा शेतातच सडून खराब होत असल्याने उत्पादकांचे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे. या गंभीर परिस्थितीवर मात करण्यासाठी सरकारने कांद्याला किमान ३० रुपये हमीभाव द्यावा, अशी मागणी येथील हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांनी केली आहे.

पान १ वरून

### बनावट दिव्यांग...

आदेश देत दिव्यांग प्रमाणपत्रांची व्यापक पडताळणी करण्याचे निर्देश दिले आहेत. राज्यातील दिव्यांग योजनांचा लाभ बोगसगिरीने घेणाऱ्यांविरुद्ध कठोर मोहीम उघडण्यात आली असून, या आधीच म्हणजे, १८ सप्टेंबर २०२५ रोजी सर्व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना आदेश पाठवण्यात आले. आदेश मिळताच जिल्हा परिषद पातळीवर पडताळणी प्रक्रियेला सुरुवात झाली आहे.

### बोगस दिव्यांगांवर...

अधिकारी, कर्मचारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा या पडताळणीत समावेश असणार आहे. दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे शासनाच्या विविध सवलती घेतल्या जात असल्याने या प्रक्रियेमुळे बोगस प्रमाणपत्र घेणाऱ्यांमध्यें भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रमाणपत्र देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवरही जबाबदारी निश्चित होणार आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या कलम ९१ नुसार, बनावट दिव्यांग प्रमाणपत्र आढळल्यास संबंधित व्यक्तीला २ वर्षांपर्यंत कारावास किंवा १ लाख रुपयांपर्यंत दंड अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकते.

### जिल्हयात इंधन...

प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, जिल्ह्यात कोणत्याही प्रकारचा तुटवडा नाही. सर्व पेट्रोल पंप कंपन्यांच्या प्रतिनिधींना पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी घाबरून न जाता अफवांकडे दुर्लक्ष करावे आणि पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी टाळावी. चुकीची माहिती किंवा अफवा पसरवणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. जनतेने संयम राखून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले आहे.

### संरक्षक भिंत उभारण्यासाठी...

आणि पोलीस प्रशासनाच्या सोयीसाठी आमदार नमिता मुंदडा यांनी प्रयत्नपूर्वक अंबाजोगाई येथे जिल्हा कारागृह मंजूर करून घेतले होते. त्यासाठी सर्व्हे क्रमांक १७ येथे ३० एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली. कारागृहाच्या मोकळ्या जमिनीवर होणारी संभाव्य अतिक्रमणे रोखण्यासाठी आणि अंतर्गत सुरक्षेसाठी ही भिंत अत्यंत आवश्यक होती. मात्र आता या निधीमुळे ही संपूर्ण जागा संरक्षित होणार असून या निर्णयाचे स्वागत होत आहे. निधीचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

### वकिलाला झालेल्या मारहाण...

राधाकिसन रामचंद्र करपे यांच्यासोबत मोटर सायकल लावण्यावरून वाद झाला. त्यानंतर राधाकिसन करपे यांनी इतर दोन पुरूष व तीन महिलांना बोलावून ड.राम डोंगरे यांना जबर मारहाण केली. या मारहाणीमुळे वकील मंडळीमध्ये दहशतीचे व भितीचे वातावरण निर्माण झाले असून २५ फेब्रुवारी रोजी न्यायालयाच्या कामकाजात वकील संघाने सहभाग घेतला नाही. मारहाण करणार्या व्यक्तीवर अद्यापही गुन्हा दाखल झाला नसल्याचे आमदार सतीश चव्हाण यांनी मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले. वकिलांना संरक्षण देण्यासाठी डिसेंबर २०२५ मध्ये विधेयक मंजूर झाले आहे. त्यानुसार वकिलांना संरक्षण मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे बीड जिल्हा न्यायालयातील वकीलांना संरक्षण द्यावे तसेच संबंधित आरोपींवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत अशी आग्रही मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी मुख्यमंत्री महोदयांकडे केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील आमदार सतीश चव्हाण यांच्या मागणीची तात्काळ दखल घेत संबंधितावर तात्काळ कारवाई करण्यासाठी जिल्हा पोलिस प्रशासनास आवश्यक त्या सूचना दिल्या जातील असे आश्वस्त केले.

### बळीराजा पाणंद रस्ता...

तरतुद करावी अशी मागणी त्यांनी केली. मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ता योजना सुरु केल्याबद्दल आ. पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिणी पवार, उपमुख्यमत्री एकनाथराव शिंदे व महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह महायुती सरकारचे अभिनंदन केले. यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ता योजना ही महायुती सरकारची महत्वाकांक्षी योजना असून शेतकऱ्यांसाठी नवीन पायाभूत सुविधा निर्माण करणारी योजना ठरणार आहे. राज्यभर ग्रामीण भागातील शेतीशी संबंधित शेतरस्ते

पान १ वरून

सुधारण्यासाठी तसेच शेतमाल योग्यवेळी बाजारपेठेत वेळेवर आणि सुरक्षित पोहोचविण्यासाठी मदत करणारी योजना ठरणार आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी मदत होणार आहे. शासनाने या योजनेसाठी मग्रारोहयो आणि इतर १३ विविध योजनेतून निधीची तरतुद केली आहे. पंधरावा वित्त आयोग, खासदार व आमदार फंड, ग्रामपंचायतींना मिळणारे जनसुविधांकरीता अनुदान, खनिज विकास निधी, ग्रामपंचायतीचे स्वउत्पन्न यांसह इतर योजनांतून या योजनेतील कामांना निधिची तरतुद केली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजनेच्या सक्षम अंमलबजावणीसाठी निधी अपुरा पडणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. पुढे बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, निधीच्या कमतरतेमुळे चांगली योजना अंमलबजावणीमुळे निष्प्रभ ठरणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी लाभदायक ठरणाऱ्या या योजनेच्या यशस्वीतेसाठी निधीची ठोस तरतुद करणे गरजेचे आहे. त्यामुळे मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजनेसाठी शासन स्तरावर स्वतंत्र लेखाशिर्षाची निर्मिती करून निधीची विशेष तरतुद करावी अशी मागणी त्यांनी विधानसभेत केली.

### मला राजकारणच...

नको आहे, त्यातून हे सगळे घडवून आणले जात असल्याचा गंभीर आरोप धनंजय मुंडे यांनी यावेळी बोलताना केला. अंजली दमानिया यांच्या बाबत विचारले असता धनंजय मुंडे म्हणाले की त्यांनी संपूर्ण जीवनात नितीन गडकरी साहेब, स्व. अजितदादा, खडसे साहेब, भुजबळ साहेब, तटकरे साहेब अशा अनेक नेत्यांवर ढीगभर आरोप करून बदनामी केली, मात्र त्यांनी केलेला एकतरी आरोप कुठे सिद्ध झालेला आहे का? केवळ खोटे पुरावे समोर आणायचे, माध्यमांच्या समोर सनसनी निर्माण करायची आणि एखाद्याला बदनाम करायचे, हे सगळे थांबवले गेले पाहिजे. असे कळकळीचे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले. तर पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना आपण सध्यातरी अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार नसल्याचे मुंडेंनी स्पष्ट केले. दरम्यान मागील काही महिन्यांपासून आपल्या विरुद्ध मोठे षडयंत्र रचले जात आहे. त्यातूनच रोज नवनवीन आरोप आणि बदनामीची एक अजब मालिका सुरू आहे. मात्र न्यायव्यवस्थेसमोर एकही आरोप सिद्ध झालेला नाही. आपली बाजू सत्याची आणि त्यामुळेच नियती आपल्या सोबत आहे; त्यामुळे सहकारी आणि कार्यकर्त्यांनी देखील संयम ठेवावा, असे आवाहनही धनंजय मुंडे यांनी आपल्या कार्यकर्त्यांना केले आहे.

### अखेर प्रदीप फाटे...

प्रदीप फाटे याचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला तरीही फाटे पोलिसांना सापडत का नाही असा प्रश्न उपस्थित करत फरार अधिकारी प्रदीप फाटेला अटक करावी या मागणीसाठी मयत सचिन जाधवर यांचे कुटुंब बुधवारी (दि.२५) बीड पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण केले. दरम्यान पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या आश्वासनानंतर हे उपोषण मागे घेण्यात आले.प्रदीप फाटेच्या अटकेसाठी दबाव निर्माण झाल्यानंतर अखेर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपीला वाघोलीमधून ताब्यात घेतले आहे. पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर,स्थानिक गुन्हे शाखाचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली महेश विघ्ने, अशोक दुबाले यांच्यासह ग्रामीण पोलीस ठाण्यातील सपोनि बाळराजे दराडे यांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे.

### शरद पवारांना उमेदवारी...

आली आहे. मविआचा राज्यसभा निवडणुकीसाठीचा उमेदवार अखेर ठरला आहे. खासदार सुप्रिया सुळेंनी पत्रकार परिषदेतून शरद पवारांच्या उमेदवारी महाविकास आघाडीतून शिक्कामोर्तब करण्यात आल्याची माहिती दिली आहे. राज्यसभा निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्यासाठी गुरुवारी (ता.४) अंतिम मुदत आहे. यामुळे गेल्या काही दिवसांपासून राजकीय घडामोडींनी वेग धरला होता. त्यातही मविआच्या गोटात राज्यसभेच्या उमेदवारीरुन एकमत होत नसल्याचं समोर येत होतं. पण सातव्या जागेसाठी महायुती प्रयत्नशील असल्याची कुणकुण लागताच महाविकास आघाडीतल्या हालचाली अखेरच्या टप्प्यात वेगवान झाल्या. अखेर महाविकास आघाडीकडून कुरघोडीचं राजकारण टाळण्यासाठी मुत्सद्दी,अनुभवी शरद पवारांच्या रुपानं एक तगडा उमेदवार मैदानात उतरवण्यात आला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकार परिषद घेऊन शरद पवारांच्या उमेदवारीची अधिकृत घोषणा केली आहे. राज्यसभेच्या निवडणुकीसाठी शरद पवार यांच्या नावाला अखेर काँग्रेस आणि उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेनं पाठिंबा जाहीर केला आहे. एकीकडे काँग्रेस आणि राष्ट्रवादीची पत्रकार परिषद सुरू असतानाच संजय राऊतांनी सिल्व्हर ओकवर जाऊन पवारांची भेट घेतल्याचं दिसून आलं.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# जनगणना प्रक्रिया समजावून घेण्यासाठी प्रशिक्षण महत्त्वाचे : जिल्हाधिकारी दिलीप स्वामी





**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

जनगणनेचे कार्य हे अत्यंत महत्त्वाचे कार्य असून त्यासाठीच्या प्रशिक्षणात सहभागी सर्व अधिकारी- कर्मचारी यांनी सर्व प्रक्रिया पूर्णपणे लक्ष देऊन समजावून घ्यावी,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले. भारतीय जनगणना २०२७ च्या पहिला टप्पा एप्रिल २०२६ पासून सुरु होणार आहे. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा चार्ज अधिकारी व जनगणना कामकाज हाताळणारे अधिकारी- कर्मचारी यांचे तीन दिवसीय प्रशिक्षणास आजपासून जिल्हाधिकारी कार्यालयात सुरुवात झाली. या प्रशिक्षणात १६८अधिकारी- कर्मचारी सहभागी झाले आहेत. या प्रशिक्षणासाठी जनगणना संचालनालयातून उपनिबंधक वाय.एस. पाटील, जनगणना अन्वेषक पवन गोडे, राजवर्धन पाटील हे अधिकारी आले आहेत. निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी एकनाथ बंगाळे यावेळी उपस्थित होते. या प्रशिक्षणात महसूल विभागाचे चार्ज अधिकारी तथा तहसिलदार, अतिरिक्त चार्ज अधिकारी तथा नायब तहसिलदार, जनगणना महसूल सहायक तथा सहायक महसूल अधिकारी, नगरपालिका नगरपंचायत विभागासाठी चार्ज अधिकारी तथा मुख्याधिकारी, अतिरिक्त चार्ज अधिकारी, जनगणना लिपिक किंवा अवल कारकून, नगररचना विभागाचे अधिकारी- कर्मचारी सहभागी झाले होते. दि.४ ते दि.६ दरम्यान सकाळी साडेनऊ ते सायं.सहा वा. पर्यंत प्रशिक्षण सुरु राहिल,असे कळविण्यात आले आहे.

## थोडक्यात...

### राज्यस्तरीय 'फ्युजन २०२६' फॅशन शोमध्ये काव्या महिला महाविद्यालयाचा दिमाखदार विजय



**आंबेजोगाई । प्रतिनिधी**

दयानंद कला महाविद्यालय, आंबेजोगाई येथे आयोजित करण्यात आलेल्या 'फ्युजन २०२६' या राज्यस्तरीय फॅशन डिझाइन स्पर्धेत काव्या महिला महाविद्यालय, आंबेजोगाईच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत प्रथम पारितोषिक पटकावले. संपूर्ण महाराष्ट्रातील २२ महाविद्यालयांच्या सहभागात झालेल्या या स्पर्धेत काव्या महाविद्यालयाच्या संघाने आपल्या कल्पकता, सादरीकरण आणि आत्मविश्वासाच्या जोरावर सर्वांचे लक्ष वेधून घेतले. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडलेल्या या रंगतदार फॅशन शोमध्ये काव्या महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी शीतल जोशी हिने 'बॉलिवूड थीम'वर आधारित सादरीकरण करत परीक्षकांची मने जिंकली. पारंपरिक आणि आधुनिकतेचा सुंदर मिलाफ साधत केलेल्या या सादरीकरणाला प्रेक्षकांकडूनही उत्स्फूर्त दाद मिळाली. या यशामागे संस्थेचे अध्यक्ष जयंत करपे सर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्राचार्य करुणा लोमटे मॅडम, प्रा. शीला होके, प्रा. अदमाने मॅडम व सर्व शिक्षक व कर्मचारीवर्ग यांनी विद्यार्थिनींचे विशेष कौतुक केले. त्यांच्या प्रोत्साहनामुळेच विद्यार्थिनींना हे यश संपादन करता आले, अशी भावना व्यक्त करण्यात आली. काव्या महिला महाविद्यालयाच्या या दिमाखदार यशामुळे आंबेजोगाई शहराच्या शैक्षणिक क्षेत्रात मानाचा तुरा रोवला गेला असून सर्व स्तरांतून विजेत्या विद्यार्थिनींचे अभिनंदन होत आहे.

### लिंबागणेशमध्ये पारंपरिक गावची मुख्य असणाऱ्या होलिकेचे दहन, ११ क्विंटल सरपनाची केली होळी



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुका उत्सवाचे गाव म्हणून ओळख असलेल्या बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे यंदा होळी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. गावातील मारुती मंदिर, लिंबागणेश समोर पारंपरिक पद्धतीने ११ क्विंटल सरपनाची भव्य होलिका दहन करण्यात आली. होलिका दहनापूर्वी विधिवत पूजन करण्यात आले. गावातील ज्येष्ठ मंडळी आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत धार्मिक मंत्रोच्चारात पूजा संपन्न झाली. त्यानंतर पारंपरिक वाद्य हलगीच्या गजरात वातावरण दणाणून गेले. हलगीच्या तालावर तरुणांनी जल्लोष करत उत्साहात होळी प्रज्वलित केली. पुर्वी गावातील पाटलांना होलिका दहन करण्याचा मान असायचा , गावातील तरुणांनी पुढाकार घेत लोकवर्गणी जमा करून ही परंपरा पुन्हा सुरू केली आहे. अनेक वर्षांपासून बंद पडलेली ही मानाची होळी पुन्हा पेटल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण होते. यावेळी हरिओम क्षीरसागर यांनी सर्व ग्रामस्थांचे सहकार्याबद्दल आभार मानत पुढील वर्षी यापेक्षा अधिक भव्य स्वरूपात होळी साजरी करण्याचा मानस व्यक्त केला.पारंपरिक वाद्यांच्या निनादात आणि होळी रे होळीच्या जयघोषात लिंबागणेशची होलिका दहन उत्साहात पार पडली.

### आनंदऋषीजी हॉस्पिटल बीड येथे महिनाभर मधुमेह रुग्णांची रक्त व लघवी मोफत तपासणी




**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रसंतांच्या पुण्यस्मृतिदिनानिमित्त आनंद ऋषीजी हॉस्पिटल येथे मार्च महिनाभर मोफत मधुमेह (साखर) तपासणी अभियान राबविण्यात येत आहे. सामाजिक बांधिलकी जपत 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर सेवा देणाऱ्या या रुग्णालयात बीड शहर व परिसरातील नागरिकांसाठी हा विशेष आरोग्य उपक्रम सुरू करण्यात आला आहे. सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे मधुमेहाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. वेळेवर तपासणी न केल्यास हृदयविकार, मूत्रपिंड विकार, डोळ्यांचे आजार यांसारख्या गंभीर गुंतागुंती उद्भवू शकतात. त्यामुळे जनजागृती व प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा या उद्देशाने हे मोफत शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत पुढील तपासण्या पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहेत : रक्तातील जेवणाअगोदरची साखर, जेवणानंतरची साखर, रँडम शुगर तपासणी. तपासणीसोबत मोफत वैद्यकीय मार्गदर्शनही दिले जाणार असून बीडमधील सुप्रसिद्ध डॉ. राजेश पारिख रुग्णांना योग्य आहार, व्यायाम व जीवनशैलीविषयी मार्गदर्शन करणार आहेत. तपासणीची वेळ : दररोज सकाळी ७ ते संध्याकाळी ७ स्थळ : आनंदऋषीजी हॉस्पिटल, जालना रोड, शाहू बँकेच्या बाजूला, बीड. या स्तुत्य उपक्रमाचा लाभ बीड शहर व आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन सकल जैन समाज, बीड व जैन सोशल फेडरेशन, अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वाशिम येथील २७ व्या राज्यस्तरीय अधिवेशनात पत्रकार वैभव स्वामी राज्यस्तरीय उत्कृष्ट संघटक पुरस्काराने सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने राज्यस्तरीय अधिवेशनामध्ये पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांना केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या शुभहस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय उत्कृष्ट संघटक नवचेतना पुरस्कार २०२६ ने सन्मानित करण्यात आले.



वाशिम येथील वाटाणे लॉन येथील शानदार सभागृहामध्ये महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे २७ वे राज्यस्तरीय अधिवेशन केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह भ प दिनकरराव वाटाणे लाभले. तर विशेष आशीर्वाद उपस्थिती आयोध्या मंदिराचे कोषाध्यक्ष गोविंद गिरी महाराज यांचे बंधू भागवताचार्य रमाकांत व्यास आणि श्री महाकाली संस्थान कासोळा देव येथील पपू गजानन माऊली यांची उपस्थिती प्रमुख आकर्षण ठरली. यावेळी व्यासपीठावर विशेष अतिथी म्हणून पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉक्टर विश्वासराव आरोटे,वाशिमचे नगराध्यक्ष अनिल केंदळे, उपाध्यक्ष राजू भांदुर्गे, वाशिम अर्बन बँकेच्या अध्यक्षा श्रीमती शीला राठी, डॉक्टर हेमराज लाहोटी,माजी नगराध्यक्ष अशोक हेडा,डॉक्टर हरीश बाहेती, गिरधारीलाल सारडा, दैनिक देशोन्नतीचे ज्येष्ठ संपादक,थोर विचारवंत डॉ.राजेश राजोरे, पत्रकार संघाचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष तथा राज्यस्तरीय अधिवेशनाचे मुख्य आयोजक निलेश सोमानी, यांच्यासह प्रदेश प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव, प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, किशोर रायसाकडा, नयन मोंढे यांच्या सह पत्रकार संघाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. दैनिक समर्थ राजयोगचे संपादक तथा पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी संघटनेला संघटनात्मक बांधण्यामध्ये दिलेल्या योगदानाची दखल घेऊन पत्रकार संघाच्या वतीने या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट संघटक नवचेतना पुरस्कार २०२६ ने सन्मानित करण्यात आले.

## विभागीय लोकशाही दिनाचे १० मार्च रोजी आयोजन

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

विभागीय स्तरावरील लोकशाही दिनाचे मार्च महिन्यात दुसऱ्या मंगळवार १० मार्च, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. तक्रार करण्यासाठीचे अर्ज विहित मुदतीत नमुना प्रप्रत्र-१ (क) मध्ये दोन प्रतीत आवश्यक त्या कागदपत्रासह विभागीय आयुक्त कार्यालयाचे आवक शाखा प्रमुख (नायब तहसीलदार) यांच्याकडे स्विकारण्यात येणार आहेत. अर्जाच्या दोन प्रती विभागीय लोकशाही दिनाच्या दिवशी विभागीय आयुक्त यांच्याकडे समक्ष पुन्हा सादर कराव्यात. तसेच ज्यांनी यापुर्वीच्या विभागीय स्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेले असतील परंतू त्यांचे प्रकरणात अद्याप कार्यवाही झाली नाही, अशा प्रकरणात त्यांना पुन्हा अर्ज देता येणार नाही. विभागीय लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. परंतू या महिन्याचा दुसरा सोमवार ९ मार्च , २०२६ रोजी नाथषष्टी निमित्त छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी स्थानिक सुट्टी असल्याने त्यानंतर येणारा कामकाजाचा दिवस मंगळवार १० मार्च २०२६ रोजी विभागीय लोकशाही दिन आयोजित करण्यात आला आहे. जिल्हास्तरावरील लोकशाही दिन कार्यक्रमात ज्या प्रश्नांची सोडवणूक होवू शकली नाही किंवा या प्रश्नाबाबत जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये तक्रारदाराचे समाधान झाले नाही, असे सर्व प्रश्न विभागीय स्तरावरील लोकशाही दिनामध्ये घेण्यात येणार आहेत, असे विभागीय आयुक्त कार्यालयाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## सामाजिक समाज हित जोपासनारे लक्ष्मण शंकराव चौगुले यांच्या वाढदिवासा निम्मीत गुणवंत लोकप्रतिनिधींचा गुणगौरव सोहळा

**तलवाडा । प्रतिनिधी**

सोलापुर जिल्ह्यातील आणदुर येथील तुळजाई स्टोन क्रेशरचे प्रोप्रायटर सामाजिक कार्यकर्ते श्री लक्ष्मण शंकर चौगुले यांच्या वाढदिवसानिमित्त समाजातील विविध शेत्रात कार्यरत आसनारे लोकप्रतिनिधी गुणवंत विध्यार्थि यांच्या गुणांना वाव मिळावा समाजातील ईतर बांधवांनी प्रेरणा घ्यावी या सामाजिक दायित्वतेतुन गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवरांनी प्रथमताह श्री लक्ष्मण शंकराव चौगुले यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेत त्यांच्या वाढदिवासा निम्मीत गौरवान्वित आभाळभर शुभेच्छा दिल्या व त्यांचे सहकारी श्री मधुकर बंदपट्टे आणि सर्व तमाम अणदुर वडार समाज बांधव यांना मानाचा जय बजरंग जय वडार आणि त्यांच्या कार्याला सलाम करत गुणगौरव सोहळ्याच्या कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले वडार समाजाचे



लोकप्रतिनिधी नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सर्व प्रशासकीय अधिकारी,गुणवंत विद्यार्थी,खेळाडू आणि समाज बांधव, माता-भगिनी आणि ऊर्जावान युवकांना

ह्या सोहळ्यातुन एक संदेश देण्यात आला की हा कार्यक्रम केवळ सत्काराचा कार्यक्रम नाही, तर वडार समाजाच्या संघर्षातून उभ्या राहिलेल्या यशाचा संघर्षमय इतिहासाचा एक एक क्षण समाजातील पुढिल पिडिला ज्ञात व्हावा या सौजळ हेतुने

प्रास्ताविक भाषणात श्री लक्ष्मण शंकर चौगुले यांनी ग्रामीण व रांगड्या भाषेत त्यांनी केलेल्या कामाची माहिती दिली व समाजातील आपण सर्वांनी छोट्या छोट्या कामातून समाज कार्य कसे करावे याची जाणीव करून दिली कार्यक्रम उशिरा चालू झाल्यामुळे माझ्यासहीत बरेच समाजबांधवांना मनोगत व्यक्त करण्यात आले नाही आशी खंत त्यांनी व्यक्त केली. त्यांच्या वाढदिवासाचे औचित्य साधुन सुंदर कार्यक्रमाचे नियोजन करून सर्वांना मानचिन्ह देऊन गुणगौरव करुन सत्कार करण्यात आला तदनंतर सर्व उपस्थित मान्यवरांनी सुगरण भोजनाचा अस्वाद घेतला. कधीकाळी उपेक्षा, संघर्ष आणि कठीण परिस्थितीत जीवन जगणारा आपला वडार समाज आज महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक नकाशावर ठामपणे उभा राहत आहे. नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य आणि पंचायत समिती सदस्य म्हणून निवडून आलेले आपले लोकप्रतिनिधी हे समाजाच्या जिद्दीचे आणि कष्टाचे प्रतीक आहेत. आज मी विशेषतः त्या सर्व व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते आणि संस्थांचे व ज्यांनी या सुंदर सोहळ्याचे आयोजन केले त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो आसे मत या वेळी कृतज्ञता व्यक्त करतांना लक्ष्मण शंकराव चौगुले यांनी व्यक्त केले. ज्यांनी हा भव्य सत्कार सोहळा आयोजित केला.

आपण केलेला हा सन्मान केवळ पदांचा नाही तो संघर्षाचा सन्मान आहे

तो मेहनतीचा सन्मान आहे

तो वडार समाजाच्या स्वाभिमानाचा सन्मान आहे! या कार्यक्रमासाठी दिवस-रात्र मेहनत घेणारे आयोजक, लक्ष्मण शंकर चौगुले व मधुकर बदपट्टे, पदाधिकारी, स्वयंसेवक आणि समाजप्रेमी बांधव - आपण समाज एकत्र आणण्याचे महान कार्य केले आहे. आजचा हा कार्यक्रम पुढील पिढीला दिशा देणारा आहे की संघर्ष कितीही मोठा असला तरी एकता असेल तर यश निश्चित आहे. आपल्या या उपक्रमामुळे समाजातील युवकांना राजकारण, शिक्षण आणि समाजसेवेच्या क्षेत्रात पुढे जाण्याची नवी प्रेरणा मिळेल. हा सत्कार म्हणजे भविष्यातील नेतृत्व घडवण्याची सुरुवात आहे.

समाजाची एकता मजबूत करन्याची गरज आहे. शिक्षणाला प्राधान्य देऊन वडार समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी खांद्याला खांदा लावून कार्य करण्याची गरज आहे शेवटी, हा ऐतिहासिक सत्कार सोहळा यशस्वी करणाऱ्या सर्व आयोजक व्यक्ती व संस्थांना माझ्याकडून मनःपूर्वक धन्यवाद, हार्दिक अभिनंदन आणि उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा! जय बजरंग, जय वडार ! जय महाराष्ट्र! लक्ष्मण शंकर चौगुले राज्य उपाध्यक्ष मी वडार महाराष्ट्राचा, चेअरमन सोलापूर जिल्हा लेबर फेडरेशन.

### जाहिर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३६३/२०२६**

अर्जदार- (१) **जानकाबाई भ्र. दगडु बावणे, वय ७७ वर्षे, धंदा घरकाम, रा. घर नं. ८-२५३, लहाने हॉस्पिटलच्या पाठीमागे, विद्यानगर, बार्शी रोड, ता. बीड जि. बीड. २) सुधाकर पि. दगडुराव बावने, वय ४८ वर्षे, धंदा-नौकरी, रा. विद्यानगर पश्चिम, ता. बीड, जि. बीड. (३) आशा भ्र. पद्माकर हजारे, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम, रा. सावरकर नगर, N-५ सिडको, ता. जि. संभाजीनगर. (४) सारिका भ्र. राजाभाऊ येवले, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम, रा. चौरे इस्टेट, संस्कार कॉलनी, जालना रोड, ता. जि. बीड** विरुध्द

गैरअर्जदार : निरंक अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे दगडू साहेबराव बावणे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे **दगडू साहेबराव बावणे, रा. घर नं. ८-२५३, लहाने हॉस्पिटलच्या पाठीमागे, विद्यानगर, बार्शी रोड, ता. जि. बीड हे दिनांक ०२/०५/२०२५ रोजी राहत्या घरी विद्यानगर बार्शी रोड बीड, ता. जि. बीड येथे मयत** झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदार क. ३ व ४ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताचे आई वडील हे या पुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. **पुढील दिनांक ०६/०४/२०२६.** आज दिनांक ०४/०३/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**(ॲड. बेदरे के. व्ही. यांच्यामार्फत)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय व स्तर बीड**

**शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक**

### जाहिर प्रगटन

**मा. श्री. कृष्णराव के. पाटील २ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर बीड़ ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ३३७/२०२६**

**रुक्मीण वि. निल**

मागणी - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत

अर्जदारः **(१) रुक्मीण भ्र. सिताराम काटकर, वयः ७३ वर्षे, धंदा घरकाम, रा. धावज्याची वाडी, ता. जि. बीड (२) मनिषा भ्र. कल्याण काटकर, वयः ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. धावज्याची वाडी, ता. जि. बीड ह.मु. शिवाजी पुतळ्या जवळ, पिंपरी गाव, पुणे ता. हवेली जि. पुणे. (३) आकाश पि, कल्याण काटकर, वयः २८ वर्षे, धंदा नौकरी, रा. वरील प्रमाणे ४) अभिषेक पि. कल्याण काटकर, वयः २६ वर्षे, धंदाः नौकरी, रा. वरील प्रमाणे**

विरुध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे कल्याण सिताराम काटकर, राहणार धावण्याची वाडी, ता. जि. बीड हे दिनांक २२/०७/२०२५ रोजी धावल्याची वाडी, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क. १ हि मयताची आई असुन अर्जदार क. २ हि मयताची पत्नी तर अर्जदार क. ३ व ४ मयताचे मुले आहेत. मयत नाम कल्याण सिताराम काटकर, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत स्थानी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदर कोर्ट सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा पेवुन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत कल्याण सिताराम काटकर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सदर प्रकरणात पुढील तारीख ०७/०४/२०२६ आहे.** आज दिनांक ०४/०३/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**(विधीज्ञ -श्री. अभिषेक हजारे)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय व स्तर बीड**

**शिक्का (स्वाक्षरीत) क. लिपीक**

### जाहीर प्रगटन

**DISTRICT CONSUMER DISPUTES REDRESSAL COMMSSION BEED**

**Under the Consumer Protection Act, 2019**

**CONSUMER CASE NO. DC/470/CC/657/2024**

**Petitioner/Appellant - ADV AJIT MURLIDHAR DESHMUKH**

**Versus**

**Opposite Party / Respondent Name: - JIJAU MASAHEB MULTI STATE CO OP CREDIT SOCIETY LTD BEED THROUGH BRANCH MANAGER ASHWINI SUNIL WANDHRE**

**To.**

**Opposite Party / Respondent(s)**

**1. JIJAU MASAHEB MULTI STATE CO OP CREDIT SOCIETY LTD BEED THROUGH BRANCH MANAGER ASHWINI SUNIL WANDHRE MAIN OFFICE FRONT OF JIJAU STATUE RAJIV GANDHI CHOWK CANAL, ROAD BEED TQ. DIST BEED, MAHARASHTRA 2: ANITA BABAN SHINDE- JIJAU MASAHEB MULTI STATE CO OP CREDIT SOCIETY LTD BEED MAINGAR OFFICE FRONT OF JIJAU STATUE RAJIV GANDHI CHOWK CANAL ROAD BEED TQ. DIST BEED, MAHARASHTRA. 3. RAMBHAU DAMU KAMBALE- JIJAU MASAHEB MULTI STATE CO OP CREDIT SOCIETY LTD BEED MAIN OFFICE FRONT OF JIJAU STATUE RAJIV GANDHI CHOWK CANAL ROAD BEED TQ. DIST BEED, MAHARASHTRA**

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे.यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक ०७/०४/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,बीड यांची आदेशानुसार

दिनांक - २४/०२/२०२६

ठिकाण - बीड.

**शिक्का**

**(स्वाक्षरीत) प्रबंधक जिल्हा ग्राहक तक्रार, निवारण आयोग, बीड.**

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

दैनिक

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • गुरुवार दि. ०५ मार्च २०२६ •

## थोडक्यात...

### जोबीया शाहनवाज तंबोली वय वर्षे ८ हिचा पहिला रोजा(उपवास) पुर्ण



**तलवाडा । प्रतिनिधी**

मुस्लिम समाजाच्या पवित्र रमजान महिन्याचे जवळपास अर्धे पर्व संपत आलेले असुन थोरांबरोबरच लहांगे बाल गोपाल सुद्धा रमजानचे पवित्र व कठोर आसनारे(रोजा) ऊपावस पुर्ण करत असल्याचे दिसुन येत आहे. गेवराई येथील जोबीया शाहनवाज तंबोली वय वर्षे ८ ह्या चिमुकलीने आयुषातील पहिला रोजा(उपवास) नुकताच पुर्ण केल्यामुळे तंबोली परिवारातील नातेवाईक, आपेष्ट, हितचिंतकांकडुन जोबीया या चिमुकलीचे कवतुक करण्यात येत असुन समाजातील थोर मोठ्यांकडुन या मुलीला दुवॉ (आशीर्वाद) देण्यात येत आहे. दैनिक मराठवाडा पत्र परिवारा कडुन जोबीया हिस खुप खुप मनस्वी शुभेच्छा.

### मदनबाई लोढा यांचे संथारा व्रतामध्ये निधन

#### प्रेमचंद, दिलीप, अशोक लोढा यांना मातृशोक



**बीड । प्रतिनिधी**

माजी आमदार स्व. चांदमल लोढा यांच्या धर्मपत्नी श्रीमती मदनबाई चांदमल लोढा (वय ८९) यांना ३ मार्च मंगळवार रोजी रात्री साडेआठ वाजेदरम्यान संथारा व्रतामध्ये वीरमरण प्राप्त झाले. त्यांच्या पार्थिवावर ४ मार्च बुधवारी मोंढा रोडवरील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. सकाळी १०:३० वाजता त्यांची डोली जालना रोडवरील गणेश हाउसिंग सोसायटीमधील अशोक लोढा यांच्या निवासस्थानापासून निघाली होती. दिवंगत मदनबाई लोढा यांच्या पश्चात तीन मुले एक मुलगी (पुष्पा संदीप भंडारी, पुणे), सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते प्रेमचंद (बाबुशेठ) लोढा, स्व. सतीश लोढा, दिलीपचंद लोढा, भाजपचे शहराध्यक्ष अशोक लोढा यांच्या त्या मातोश्री होत.

## श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान ते श्रीक्षेत्र पैठण...

# पायी दिंडी सोहळ्याचे श्रीसंत एकनाथ महाराज षष्ठी निमित्त प्रस्थान

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

श्री गुरू ईश्वर बाबा भारती श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान बेलगाव ते श्रीक्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळ्याचे श्रीसंत शांती ब्रम्ह एकनाथ महाराज षष्ठी निमित्त दरवर्षी प्रमाणे याही वर्षी बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्री क्षेत्र बेलेश्वर संस्थान ते श्रीक्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन मठाधिपती ह.भ.प.महादेव बाबा भारती महाराज आणि ह.भ.प. शांतीब्रम्ह तुकाराम महाराज भारती यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. आज दि.०३ मंगळवार रोजी सकाळी श्रीक्षेत्र बेलेश्वर व श्रीगुरु ईश्वर बाबा भारती यांचा अभिषेक करून पायी दिंडीचे प्रस्थान झाले.पायीदिंडींचे हे १२ वे वर्ष असुन मोठ्या संख्येने भाविक यात



सहभागी झाले आहेत. टाळ मृदंगाच्या गजरात ग्यानबा तुकाराम च्या नामघोषात दंग दिंडीतील भाविकांचे दिंडी मार्गावरील भाविकांनी आकर्षक फुलांनी सजवलेल्या रथामध्ये विराजमान महंत महादेव भारती महाराज व शांती ब्रम्ह तुकाराम महाराज यांची ठिकठिकाणी आतषबाजी करत, सडासमार्जन, रांगोळी काढून सुवासिनींनी पाद्यपुजन करत औक्षण करत मनोभावे स्वागत केले. ग्रामस्थांनी दिंडीतील भाविकांची ठिकठिकाणी चहा पाणी,लिंबु सरबत,नाष्टा यांची सोय करण्यात आली होती.काल दुपारच्या भोजणाची पंगत पिंपरनई ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली होती. त्यानंतर पायी दिंडी मुक्कामी बेलखंडी गावाकडे मार्गस्थ झाली.

पायी दिंडी सोहळा ०३ मार्च ते ११ मार्च दरम्यान पायी दिंडीतील भाविकांना ह.भ.प.दत्ता महाराज वायभट, ह.भ.प. नानाभाऊ भिंगले, ह.भ.प.सुरेश महाराज जाधव, ह.भ.प.रामहरी महाराज येळवे, ह.भ.प.विठ्ठल महाराज बांगर, ह.भ.प.तुकाराम महाराज भोसले, ह.भ.प. बाबासाहेब शिंदे,ह .भ.प. अनंतकाका मुळे यांच्या किर्तनाचा बेलखंडी, बेलुरा, फुल सांगवी, अर्धपिंपरी, मुंगी, याठिकाणीहुन मार्गक्रमण करत असताना लाभ घेता येणार आहे.दि.१० मार्च रोजी पैठण येथे मुक्कामी पोहोचणार आहे.दि.११ मार्च रोजी ह.भ.प. शांतीब्रम्ह भक्तिदास महाराज शिंदे (तुकाराम महाराज संस्थान, ढेकळे महाराज आश्रम बेलखंडी) यांच्या काल्याच्या किर्तनाने सोहळ्याची सांगता होणार आहे. नाथषष्ठी सोहळ्यात भजन, किर्तन, भारूड, संगीत भजन आदी कार्यक्रमांची मेजवानी असते. भाविकांच्या जेवणाची आणि मोफत जेवणाची सोय संस्थानच्या वतीने केली जाते. शांतीब्रम्ह तुकाराम महाराज भारती यांच्या अथक प्रयत्नाने पायी दिंडी सोहळ्याला वेगळे स्वरूप आले असुन पायीदिंडीत सहभागी होणाऱ्या पंचक्रोशीतील भाविकांचा सहभाग उत्तरोत्तर वाढत आहे.

## नॅशनल सायन्स ओलंपियाड परीक्षे मध्ये चंपावती विद्यालयाच्या १९ विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल

**बीड । प्रतिनिधी**

चंपावती माध्यमिक विद्यालयामध्ये पाचवी ते दहावी इयत्ता मधून एकूण १६१ विद्यार्थी परीक्षेसाठी बसलेले होते. त्यापैकी १९ विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल प्राप्त झालेले आहे. त्यामुळे शाळेचा शैक्षणिक आलेख अधिकच उंचावलेला आहे. चंपावती विद्यालयामध्ये नेहमीच विविध स्पर्धा परीक्षा घेतल्या जातात त्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून प्रोत्साहन दिले जाते .सन २०२५ –२६ मध्ये नॅशनल सायन्स ओलंपियाड ही परीक्षा नोव्हेंबर महिन्यामध्ये घेण्यात आली होती. त्यामध्ये एकूण १६१ विद्यार्थी प्रविष्ट झालेले होते त्यामधील १९ विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल प्राप्त झालेले आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे माननीय श्री महाजन सर ,सौ वैरागे मॅडम ,श्री गोसावी सर ,सौ .टेकाळे मॅडम , श्री .जोशी सर ,सौ .भोपळे मॅडम, सौ .कांबळे मॅडम इत्यादी विज्ञान विषय शिक्षकांनी मार्गदर्शन



केले. सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे अभिनंदन व कौतुक श्री चंपावती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री .कालिदासराव थिगळे, उपाध्यक्ष मा. डॉ. श्री. अनुराग पांगरीकर, सभापती मा .प्रा.श्री. चंद्रकांत मुळे ,उपसभापती मा. श्री. विलासराव बडगे , कार्यवाह मा. प्रा. श्री. जगदीशराव काळे, उप कार्यवाह मा. श्री .गोविंदजी कासट ,कोषाध्यक्ष मा. डॉ. श्री. दिलीपराव देशमुख, संचालक मा.श्री. शरद रावजी रायते, मा.डॉ. साहेबरावजी भोपळे, मा.श्री .मधुसूदनजी बाहे गव्हाणकर, मा. श्री. नारायणराव लोणकर ,मा.श्री. विश्वंभरराव थिगळे मा. श्री .जवाहरलालजी सारडा तसेच शाळेच्या प्राचार्या तथा मुख्याध्यापिका सौ. एन .डी. कुलकर्णी मॅडम उप मुख्याध्यापक श्री .एम. पी. महाजन ,पर्यवेक्षक श्री. यु. एस घाडगे, श्री खडके सर ,शिक्षकेतर कर्मचारी श्री . जाजू सर ,श्री. संजय कुलकर्णी , शिक्षक प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन व कौतुक केले.

## चंदन शहावली उर्स कमिटीच्या अध्यक्षपदी शैलेश सोनवणे तर सचिव पदी प्रसाद देशमुख

**चौसाळा । प्रतिनिधी**

सालाबाद प्रमाणे याही वर्षी ग्रामदैवत चंदन शहावली दर्गा चौसाळा उर्स कमिटीच्या गतवर्षीचे अध्यक्ष उपसरपंच अंकुशराव कळसे यांच्या अध्यक्षतेखाली व ज्येष्ठ पत्रकार बळीराम राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली चंदन शहावली दर्गा चौसाळा येथे नूतन कार्यकारिणीच्या निवडीसाठी यावर्षीची जत्रा पार पाडण्यासाठी बैठक संपन्न झाली २६ मार्च २७ मार्च व २८ मार्च तीन दिवस संपन्न होणाऱ्या या जत्रेसाठी नूतन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली यावेळी सर्वानुमते शैलेश



सोनवणे यांना अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले तर उपाध्यक्ष म्हणून विराज मुलाने कोषाध्यक्ष म्हणून त्रिंबक जोगदंड तर सचिव म्हणून प्रसाद देशमुख यांची सर्वानुमते निवड करण्यात आली मार्गदर्शक म्हणून गतवर्षीचे अध्यक्ष उपसरपंचअंकुशराव कळसे,



ग्रामपंचायत सदस्य किशोर ढोकणे, ज्येष्ठ पत्रकार बळीराम राऊत, युवा नेते पंजाब वाघमारे, युवा नेते सुधाकर गुंजाळ यांची निवड करण्यात आली तर संदल कमिटी, शोभेची दारू संघाच्या गाड्या व कुस्ती कमिटीची ही निवड करण्याचे ठरले त्याचबरोबर कव्वाल्यांचा बहारदार कार्यक्रम संपन्न करण्याचे ठरले आहे तसेच चांगले कार्यक्रम मिळाल्यास तेही घेण्यात येतील असाही ठराव सर्वानुमते घेण्यात आला . यावेळी यापूर्वीचे अध्यक्ष दशरथ थोरात, चंदन मिटकरी, पंचायत सदस्य बाबासाहेब जाधव, पत्रकार मिराज मुलाने चंदन सावली दर्याचे पुजारी जाकीर मुजावर, तय्यब मुजावर, सादिक मुजावर व यावर्षी यांचे साल सुरू होत आहे असे अनिस भाई मुजावर गावातील अनेक प्रतिष्ठित नागरिक गावातील जनता ब्रास बँड चे संतोष सोनवणे तसेच अनेक नागरिक व मान्यवर पत्रकार आवर्जून उपस्थित होते



*अश्मिरा मुदसिर शेख वय ७ या मुलीच्या पहिला रोजा पूर्ण*

## पिंपळनेर भागात कडवळ, मका, हिरव्या चाऱ्याला वाढली मागणी

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

उन्हाळ्याची तीव्रता वाढल्याने तसेच बहुतांश साखर कारखान्यांच्या गाळप हंगाम संपल्याने जनावरांसाठी मकासारख्या हिरव्या चाऱ्याची मागणी दूध उत्पादकांकडून वाढू लागली आहे कारखाने सुरू असताना दूध उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणात जनावरांना हिरवाचारा म्हणून उसाच्या वाढ्याचा वापर करीत होते. त्यामुळे आतापर्यंत मका, कडवळ यासारख्या हिरव्या चाऱ्याला फारशी मागणी नव्हती. मात्र, गाळप हंगाम बंद झाल्याने बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरातील शेतकरी मका, कडवळ या चाऱ्याकडे वळल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांना यावर्षीचा गाळप हंगाम लवकर संपण्याचा अंदाज होता. त्यामुळे बहुतांश शेतकऱ्यांनी नियोजन करून मका आणि कडवळ या चारा पिके घेतली आहेत. ही पिके मार्च, एप्रिल महिन्यात उपयोगात येतील. काही भागात आतापासूनच या पिकांना मोठी मागणी सुरू झाली आहे.

मका या हिरव्या चाऱ्याचा दूध उत्पादक मुरघास करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापर करतात. हा मुरघास साठवून ठेवता येतो. तो उन्हाळ्यात चार–पाच महिन्यांपर्यंत वापरता येतो. सध्या हिरव्या चाऱ्याची उपलब्धता कमी असल्याने दोन ते अडीच हजार रुपये भावाने मका या पिकांची विक्री होत आहे.

## जमशेदजी टाटा यांच्या जयंतीनिमित्त मातोश्री संस्थेने बिबी गावात मोफत आरोग्य शिबिर आयोजित



**बीड । प्रतिनिधी**

टाटा समूहाचे संस्थापक आणि भारतीय उद्योजकतेचे जनक जमशेदजी टाटा यांच्या जयंतीचे औचित्य साधून बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील बिबी गावात एका भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरामध्ये परिसरातील नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली आणि गरजू रुग्णांवर मोफत उपचार व औषधोपचार करण्यात आले.बीड येथील 'मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थे'ने या उपक्रमासाठी पुढाकार घेतल्यामुळे बिबी आणि पंचक्रोशीतील अनेक ग्रामस्थांना या मोफत आरोग्य सेवेचा लाभ घेता आला. यावेळी उपस्थित संस्थेचे डॉ.स्नेहल पवार, डॉ.गायके सर, रोहन डोळस,तेजस पवार व गावकरी होते.

## शालेय विद्यार्थ्यांची सौ. के.एस.के. महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागाच्या प्रयोगशाळेस भेट

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने, शाळा महाविद्यालय सुसंवाद या कार्यक्रमांतर्गत, बीड येथील कल्याण पिंगळे पब्लिक स्कूल च्या विद्यार्थ्यांनी, सौ. के. एस. के. महाविद्यालय बीड मधील भौतिकशास्त्र विषयाच्या प्रयोगशाळेस भेट दिली. शाळेतील विज्ञान शिक्षक श्री बारगजे सर व श्रीमती पवार मॅडम यांच्यासह इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांनी भौतिकशास्त्र विभागाच्या प्रयोगशाळेस भेट दिली. यावेळी भौतिकशास्त्र विभागांमध्ये प्रा. अशोक डोंगरे, डॉ. शिवाजी राऊत व प्रा. रुपेश कोकाटे सर यांनी सर्वांचे स्वागत केले व याठिकाणी असलेली पदवी, पदव्युत्तर व संशोधन प्रयोगशाळा या विद्यार्थ्यांना दाखवली, तसेच यावेळी डॉ. शिवाजी राऊत यांनी लेसर लाईट, स्कॅटरिंग ऑफ लाईट,



टोटल इंटरनल रिफ्लेक्शन ऑफ लाईट अशा प्रकारचे प्रयोग लेसर लाईटच्या साह्याने करून दाखविले, तसेच विविध प्रकारच्या लेन्स च्या सहाय्याने ओरिजिनल मूळ प्रतिमा आभासी प्रतिमा जवळचे स्पष्ट दिसणारा चष्म्याची काच लांबचा स्पष्ट दिसणाऱ्या चष्म्याची काच इत्यादी विषयी सविस्तर माहिती प्रात्यक्षिकासह दाखविली. डार्क रूम मध्ये प्राध्यापक अशोक डोंगरे यांनी स्पेक्ट्रोमीटर त्याचा वापर, सोडियम किंवा मर्क्युरीचा प्रकाशस्त्रोत्र वापरून, एका रंगापासून प्रिझम च्या साह्याने डिस्पर्षण ऑफ लाईट द्वारे सप्तरंग कसे दिसतात हे प्रात्यक्षिकासह दाखवले, तांबडा, नारंगी, पिवळा, हिरवा, निळा, पारवा, जांभळा या सप्त रंगांच्या तरंग लांबी विषयी माहिती दिली. इंद्रधनुष्य कसे तयार होते हे या उदाहरणावरून समजावून सांगितले, हे सर्व प्रयोग विद्यार्थी जिज्ञासूपणे पहात होते, त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देण्यात आली.

## जुनैरा मेहरिन व अलविरा फातेमा यांचा जीवनातील पहिला रोजा पूर्ण

**बीड । प्रतिनिधी**

सध्या मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना सुरू असून सर्वत्र भक्तीभाव, आनंद आणि आध्यात्मिक वातावरण अनुभवायला मिळत आहे. या पवित्र महिन्यात रोजा (उपवास) ठेवणे फर्ज मानले जाते. त्यामुळे महिला, पुरुष, युवक–युवती यांच्यासह लहान मुले–मुलीही उत्साहाने रोजे ठेवून नमाज अदा करतात व कुरआन पठण करून अल्लाहची इबादत करतात. याच पार्श्वभूमीवर बीड येथील ड. रईस पठाण यांची पुतणी तथा इम्रान पठाण यांची कन्या जुनैरा मेहरिन (वय ९ वर्षे) आणि अलविरा फातेमा (वय ७ वर्षे) या दोन चिमुकल्यांनी मंगळवार, दि. ३ मार्च रोजी आपल्या जीवनातील पहिला रोजा पूर्ण केला. दिवसभर उपवास पूर्ण करून त्यांनी अत्यंत श्रद्धा व संयमाने अल्लाहची इबादत केली. पहिल्या रोजाच्या निमित्ताने संध्याकाळी सूर्यास्तानंतर मोमीनपुरा बायपास रोड येथील सिटी लॉन्स येथे त्यांचा इफ्तार कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी दोन्ही मुलींचा पुष्पहार घालून सन्मान करण्यात आला.



कुटुंबीयांनी त्यांच्या या धार्मिक जिद्दीचे कौतुक करत आनंद व्यक्त केला. या पवित्र प्रसंगी परिवारात उत्साहाचे वातावरण असून दोन्ही चिमुकल्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे. त्यांच्या या धार्मिक प्रेरणादायी कृतीमुळे इतर मुलांनाही सद्गुणांचा आदर्श मिळत आहे.